MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

## धनंजय मुंडेंकडून राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी तक्रार व्हाट्सअप क्रमांक जारी

मुंबई – कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी एक दिवस आधी राज्याच्या खरीप हंगामोच्या नियोजनाचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांसाठी 'कृषी तक्रार व्हाट्सप हेल्पलाईन क्रमांक' जारी करण्याचे निर्देश दिले, त्याप्रमाणे कृषी विभागाकडून ९८२२४४६६५५ हा व्हाट्सप क्रमांक जारी करण्यात आला आहे. राज्यात कुठेही कृषी निविष्ठा विक्रेते शेतकऱ्यांना विविष्ट कंपनीचे बियाणे किंवा खत घेण्याची सक्ती करत असतील, बी–बियाणे, खते किंवा कीटक नाशकांची चढ्या भावाने विक्री करत असतील, अनावश्यक वस्तू खरेदी करण्याची सक्ती करत असतील, एखादे बोगस वाण विक्री करत असतील, किंवा अशा काही तक्रारी असतील, त्या तक्रारी शेतकऱ्यांनी दुकानाचे नाव, ठिकाण झ तालुका, जिल्हा यांसह उपलब्ध असलेल्या पुराव्यासह वरील व्हाट्सप क्रमांकावर पाठवावेत. त्या प्रत्येक तक्रारीची तातडीने दखल घेऊन, त्याची शहानिशा करून त्यावर कारवाई केली जाईल, त्याचबरोबर तक्रार देणाऱ्या शेतकरी बंधू–भगिनींचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल, अशी माहिती धनंजय मुंडे यांनी दिली आहे. मागील वर्षी देखील धनंजय मुंडे यांनी हा अभिनव उपक्रम राबविला होता. त्याद्वारे हजारो तक्रारींची सोडवणूक करण्यास मदत मिळाली होती. त्यामुळे याही वर्षी हा उपक्रम राबविण्याचा निर्णय धनंजय मुंडे यांनी घेतला असून, सदर व्हाट्सप क्रमांक कार्यान्वित करण्यात आला आहे.



बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२५७ | रविवार दि.०९ जुन २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -257 | SUNDAY DT. 09 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# कोणत्याही पदावर कुटुंबीय किंवा नातेवाईकांची नियुक्ती करू नका!

## शपथविधीपूर्वी नरेंद्र मोदींचा नव्या मंत्रिमंडळाला सल्ला

नवी दिल्ली : देशात एनडीए तिसर्यांदा सत्तास्थापन करणार असून आज संध्याकाळी सव्वासात वाजता नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा पार पडणार आहे. एकूण ६५ खासदार आज मंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. तत्पूर्वी आज शपथ घेणार्या नव्या मंत्र्यांना नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निवासस्थानी चहापानासाठी बोलावले होते. यावेळी मोदींनी त्यांना काही आवश्यक सूचना केल्या. तसेच नव्या मंत्र्यांना मार्गदर्शन केले.

नरेंद्र मोदींनी आजच्या बैठकीत संभाव्य मंत्र्यांना १०० दिवसांच्या अजेंड्यावर काम करण्यास तयार राहण्यास सांगितले आहे. मंत्रिमंडळात सामील झाल्याबद्दल मोदींनी सर्वांचे अभिनंदन केले. तसेच आपल्याला विकसित भारताचा अजेंडा पुढे चालू ठेवण्याची गरज आहे. कोणत्याही व्यत्ययाशिवाय



**विकासकामे सुरू ठेवायची आहेत, असा सल्ला मोदींनी दिला.**

नरेंद्र मोदी नेमकं काय म्हणाले?

नरेंद्र मोदी म्हणाले, सर्व खासदार सारखेच आहेत. प्रामाणिकपणावर लक्ष केंद्रित करा. गरीब लोक आणि कामगारांवर विशेष लक्ष द्या. किमान चार दिवस मंत्रालयात काम करा आणि उरलेला वेळ शेतात घालवा. कोणत्याही पदावर कुटुंबीय किंवा नातेवाईकांची नियुक्ती करू नका. असा संदेश देत नरेंद्र मोदींनी भावी मंत्र्यांना राष्ट्रपती भवनात वेळेपूर्वी पोहोचण्यास सांगितले.

नरेंद्र मोदी आज राष्ट्रपती भवनात तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. यावेळी त्यांच्यासोबत मंत्र्यांचाही शपथविधी होणार आहे. राज्यातून मुरलीधर मोहोळ, नितीन गडकरी, रामदास आठवले, रक्षा खडसे, प्रतापराव जाधव, पियुष गोयल यांची मंत्रीपदी वर्णी लागणार आहे. तर भाजपकडून शपथ घेणाऱ्या इतर मंत्र्यांच्या नावांची यादीही समोर आली आहे.

## सध्याच्या उपसरपंच्या गुंडगिरी ने भाटवडगावचे ग्रामस्थ भयभीत!

# भाटवडगावच्या उपसरपंचाचा महाप्रताप ; राशन दुकानाची तक्रार केली, म्हणून तक्रारदारास मारहाण

माजलगाव / प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मौजे भाटवडगावच्या राशन दुकानांची चौकशी करून त्यावर रितसर कार्यवाही करण्यात यावी यासाठी तक्रारदार शेख रियाज यांनी तहसीलदार यांना निवेदन दिले होते.

गावचा राशन चा होत असलेला काळा बाजार थांबावा .व गोरगरीब जनतेसाठी शासन व प्रशासन यांच्या माध्यमातून मिळणारे स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडून मिळणारे धान्य , तांदूळ , गहू आदी . ते संबंधित लाभार्थी यांना मिळावे . व या दुकानात होत असलेला काळा बाजार थांबावा यासाठी तक्रारदार यांनी पध्दतशीर पणे माजलगाव तहसीलदार यांना निवेदन दिले. त्या अनुषंगाने पुरवठा विभागाच्या वतीने संबंधित तक्रारदार , तलाठी , व स्वस्त धान्य दुकानदार यांना रितसर नोटिसा पण काढल्या आहेत.

पण स्वस्त धान्य दुकानदार शेख जावेद नसिरमियॉ हे स्वतः जायमोक्यावर हजर न राहता . त्यांनी पाळलेले भाटवडगावच्या गावगुंड व सध्याचा स्वतः ला गावचा उपसरपंच म्हणून मिरवणाऱ्या इसमाने चक्क चौकशीला आलेल्या अधिकारी व पत्रकार यांच्या समोर तक्रारदार यांच्यावर दबावतंत्राचा वापर करून दमदाटी करण्यावरच राहिला नाही तर त्यांने खुद तक्रारदार शेख रियाज व त्यांच्या सहकाऱ्यांला धक्काबुक्की करत गचूरीला धरून जमिनीवर खाली पाडले. त्यावर न थांबता तक्रारदारांच्या आंगावर बसून जिवे मारण्याचा प्रयत्न केला आहे.

भाटवडगावच्या सध्या घ्या उपसरपंचाला एवढा माज आला तरी कुठून. स्वस्त धान्य दुकान म्हणे त्यांचें असल्याचा आव आणत असून अशा प्रकारे गावात मिरवत आहे. व



कोणी दुकानांची तक्रार माजलगाव च्या तहसीलदार यांच्याकडे केली की तक्रारदारांना चक्क मारहाण करणे हे या भाटवडगावच्या सध्याचा असलेला उपसरपंच्या रक्तात भिणल्याचे दिसून येत आहे. सत्तेचा एवढा माज, व एवढी गुर्मी कशासाठी ? हा प्रश्न निर्माण होतो आहे.

एक तर स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडून व्यवस्थित गोरगरीब जनतेला मिळणारे धान्य मिळत नाही. त्या ठिकाणी ना दुकानाच्या बोर्ड ना भाव फलक या सर्व गोष्टी ला पाठीशी घालण्याचे काम त्या गावचे धान्य काळ्या बाजारात देवून विकण्याचे काम या उपसरपंचाच्या व त्यांच्या पाळीव गावगुंड यांच्याकडून होत आहे.

तरी माजलगाव च्या कर्तव्य दक्ष तहसीलदार वर्षा मनाळे यांनी वेळीचं लक्ष देवून संबंधित स्वस्त धान्य दुकानदार यांचे दुकानाला सिल करून गावगुंड प्रवृत्ती चा असलेला उपसरपंच्या वेळीच मुसक्या आवळून दोघांवरही फौजदारी गुन्हा दाखल करावा. अशी मागणी भाटवडगावच्या त्रस्त गोरगरीब जनतेने केली आहे....

## अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ बीड आणि नाथमुद्रा प्रतिष्ठान

तसेच नाथमुद्रा बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने वर्ग १० वी,वर्ग १२ वीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

बीड– प्रतिनिधी– अखिल भारतीय नाथपंथी समाज आणि नाथमुद्रा प्रतिष्ठान तसेच नाथ मुद्रा बचतगट बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यातील वर्ग १० वी आणि वर्ग १२ वीच्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार साईप्रसाद हॉटेल येथील हॉलमध्ये दि .१६/६/२०२४ रविवार रोजी ठीक १० वाजता करण्यात येणार आहे तरी सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ बीडचे कार्याध्यक्ष माननीय श्री संजय सावंत सर यांनी आवाहन केले आहे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्य सदस्य तसेच बीड येथील सुप्रसिद्ध डॉक्टर के बी पैठणकर तर अध्यक्ष मा गटविकास अधिकारी तसेच बीड जिल्हा महासंघ माननीय श्री भरत चव्हाण साहेब तसेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार विनोदाचार्य ह भ प जोगी महाराज यांच्या हस्ते होणार आहे बीड जिल्हा सचिव हरिभाऊ भराडी ग्रामीण अध्यक्ष रंगनाथ पैठणकर युवा अध्यक्ष भैरवनाथ शिंदे सर दत्ता शिराळकर डॉक्टर शिवनाथ सुरवसे माजी अध्यक्ष केदारनाथ चव्हाण सर प्रा. यादव सर, सरपंच बाबाजी पवार राज्य सदस्य जयश्रीताई चव्हाण यांच्या उपस्थितीत होणार आहे शिवाय यावेळेस नुकतेच सेवानिवृत्त झालेले माननीय राजकुमार शेळके साहेब सचिव यांचाही सपत्निक सत्कार करण्यात येणार आहे जिल्ह्यातील नाथ बांधवांनी उपस्थित रहावे.

## माजलगाव येथील हिवरा बु. गावात वीज पडून ९ मेंढ्यांचा मृत्यू

गेवराई / प्रतिनिधी

गेवराई : माजलगाव तालुक्यातील हिवरा बु. गावात वीज पडून रामकिसन टकले या मेंढपाळांच्या तब्बल ९ दगावल्या. शुक्रवारी (दि.७) रात्री ९.३० च्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. यादरम्यान वीज पडल्याने ही दुर्घटना घडली. याबाबत सविस्तर वृत्त असे की, गेवराई तालुक्यातील रसुलाबाद येथील रामकिसन टकले, किरण काळे आपल्या मेंढ्या चारण्यासाठी हिवरा या गावी आले होते. शुक्रवारी रात्री साडेनऊच्या सुमारास अचानक वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. यादरम्यान वीज पडल्याने रामकिसन टकले यांच्या ८ मेंढ्या आणि किरण काळे यांची १ अशा ९ मेंढ्यांचा मृत्युमुखी पडल्या. याची माहिती देण्यात माजलगाव तहसीलदार वर्षा मनाळे यांना देण्यात आली. त्यानंतर मंडळ अधिकारी, तलाठी यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला.

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक संदीप आटोळे यांच्याकडून तक्रारदारांचा गौरव

### पोलीस उपअधीक्षक शंकर शिंदे व कर्मचाऱ्यांचेही केले अभिनंदन

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई : मागच्या महिनाभरात बीडच्या लाचलुजपत प्रतिबंधक विभागाने राज्यात चर्चेत राहणाऱ्या कारवाया करत लाचखोरांविरुद्ध कडक मोहीम हाती घेतली आहे. त्यामुळे लाचलुचप प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक असलेले संदीप आटोळे यांनी बीडमध्ये येऊन संबंधित तक्रारदारांचा गौरव केला आहे. एवढेच नव्हे तर उत्कृष्ट कारवाईबद्दल उपाधीक्षक शंकर शिंदे यांच्यासह पूर्ण टीमचे ही त्यांनी अभिनंदन केले.

राज्यातील सर्वाधिक चर्चेत राहणाऱ्या कारवाया बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मागच्या महिनाभरात केल्या आहेत. या कारवाईत मोठ मोठे मासे गळाला लागले. यात विशेष करून आर्थिक गुन्हे शाखेचा पोलीस



निरीक्षक हरिभाऊ खाडे, कार्यकारी अभियंता सलगरकर सोबत एका शैक्षणिक संस्थेतील मुख्याध्यापकालाही रंगेहाथ पकडण्यात आले. मागच्या महिनाभरात बीडच्या लाचलुजपत प्रतिबंधक विभागाने जवळपास १२–१३ लाचखोरांवर कारवाई केली होती. त्यामुळे या प्रकरणातील तक्रारदारांचा गौरव करण्यासाठी छत्रपती संभाजी नगरवरून पोलीस अधीक्षक संदीप आटोळे बीडला आले होते. त्यांनी संबंधितांचा गौरव करून बीडचे डीवायएसपी शंकर शिंदे यांचेही कौतुक करून त्यांना अशाच कारवाया करण्याबाबत सूचना केल्या. तसेच जास्तीत जास्त तक्रारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे यायला हव्यात यासाठी तक्रारदारांना संरक्षण व त्यांचे प्रलंबित कायदेशीर काम करून देण्याची हमी पोलीस अधीक्षक संदीप आटोळे यांनी दिली.



(बीड)

केज– कळंब रोडवर साळेगाव हद्दीत एक कार रस्त्याच्या कडेला जावून वीज वाहक खांबाला धडकली. मात्र या धडकेत लोखंडी खांब पडला आहे मात्र आतील चालक आणि प्रवाशांना कोणतीही इजा झालेली नाही.या बाबतची माहिती अशी की, दि. ८ जून रोजी सायंकाळी ६:३० वा. च्या दरम्यान प्रचंड वारे आणि पाऊस सुरू असताना केजकडून कळंबकडे जात असलेली कार क्र. (एम एच –०३/ सी एच –०८२८) या गाडीच्या चालकाचे वाहनावरील नियत्रण सुटल्याने वाहन रस्त्याच्या कडेला गेले आणि वीज वाहक खांबाला धडकले. हा अपघात एवढा भयानक होता ही या धडकेने एक लोखंडी खांब उखडून पडला तर दुसरा वाकलेला आहे. मात्र सुदैवाने वीज पुरवठा बंद होता आणि गाडीचे जरी नुकसान झालेले असले तरी आतील प्रवाशी व चालक मात्र पूर्णतः सुरक्षित असून त्यांना कोणतीही किरकोळ मार लागलेला नाही.



माजलगांव ।प्रतिनिधी

माजलगांव तालुक्यामध्ये रात्री पाऊस झाला त्यामुळे शेतकरी बि बियाणे खरेदी करण्यासाठी सकाळपासुन मोंढ्यात गर्दी करून आहेत. काही दुकानदार शेतकऱ्यांची लुट करत आहेत. हि लुट न थांबल्यास मंगळवारी जिल्हाधिकारी यांची गाडी अडवणार असल्याचा इशारा भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला. शेतकऱ्यांची लुट थांबविण्यासाठी थावरे सकाळपासुन मोंढ्यात ठिय्या मांडुन बसलेले आहेत.

खरीप हंगामात शेतकरी मोठ्या प्रमाणात बि बियाणे खते खरेदी करत असतात. काही कृषी दुकानदार शेतकऱ्यांची आर्थिक लुट करतात. अशा दुकानदारा विरोधात कोणतीही कारवाई केली जात नाही. माजलगांव तालुक्यात काल चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी सकाळपासुन बियाणे खरेदी करण्यासाठी मोंढ्यात गर्दी केली. शेतकऱ्यांची लुट थांबविण्यासाठी भाई गंगाभिषण थावरे माजलगांवच्या मोंढ्यात ठिय्या मांडुनआहेत. शेतकऱ्यांची लुट न थांबल्यास मंगळवारी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ–मुंडे यांची गाडी अडविणार असल्याचा इशारा गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे.

## धारूर घाटात लोखंड घेऊन जाणाऱ्या आयसर टेम्पोचा ब्रेक निकामी झाल्याने अपघात

प्रतिनिधी /वाल्हे गंगाधर

धाराशिव येथून सिरसाळा कडे लोखंड घेऊन जाणाऱ्या टेम्पो घाटात ब्रेक निकामी झाल्याने अपघात झाल्याची घटना रविवारी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास घडली .या अपघातामध्ये चालक क्लीनर सुखरूप बचावले .अपघातानंतर टेम्पोचे मागचे दोन चाक रस्त्यावर आले होते . चाके रस्त्यावर आल्याने आर्धा तास वाहतूक कोंडी झाली होती .

धारुर शहरापासून जवळच असलेल्या राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी वर घाटातील धोकादायक वळणावर रविवारी (दि. ९) सकाळी अपघात घडला. धाराशिव येथून सिरसाळाकडे लोखंड घेवून जाणारा टेम्पो(क्र. एम एच ०४इ,एल ९०५१) एका वळणावर ब्रेक निकामी झाले होते.टेम्पो खोलदरीत जाणाऱ्या भीतीने चालकाने रस्त्यालगत डोंगरावर वळवला .यात



टेम्पो वर गेल्यानंतर मागची दोन चाक बाजूला निसटून रस्त्यावर अली . यात चालक व क्लिनर सुखरूप बाहेर आले .अपघातानंतर टेम्पोचे मागचे दोन चाक मोडून रस्त्यावर पडल्याने काही काळ वाहतूक कोंडी झाली होती . नागरिकांच्या मदतीने टेम्पोचे चाके रस्त्याच्या बाजूला काढण्यात आले .नंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली .



# एकताच्या व्यासपीठावरून साहित्याचा जागर - म.रा.सा.व सं.मंडळ मुंबई,सदस्य विलास सिंदगीकर

## काव्य संमेलनाध्यक्षपदी सुप्रसिद्ध चित्रपट गीतकार डॉ.विनायक पवार

# राम लक्ष्मणाचा वंश वृक्ष !

## लेक जावयांचा स्नेह मिलन (गेट टूगेदर ) सोहळा !

पंन्नास वर्षापुर्वीच्या आठवणीला उजाळा ,लग्नाच्या वर्धापन दिनाचे औचित्य !

शिरूरकासार : संस्कार व गुरूच्या च्या अशिर्वादाची शिदोरी घेऊन राम लक्ष्मणाच्या वंशवृक्षाची व्याप्ती या लेक जावायी स्नेहमिलनाच्या माध्यमातून पंन्नास वर्षापुर्वीच्या त्या क्षणाला उजाळा देण्याचे काम पाटील कुटूंबातील सतरा लेकी आणि जावयांनी करून सासर माहेर या ऋणानुबंधाचा गोडवा दाखवून देत पुढील पिढीसाठी आदर्श ठेवण्याचे काम केले .

येथील वै .लक्ष्मणराव पाटील व वै.राम पाटील या दोन भावाचा विस्तार लक्ष्मण पाटील यांना पांच मुल ,दोन मुली तर वै .राम पाटील यांना तीन मुल तीन मुली असा परिवार होता ,थोरले लक्ष्मणराव यांचे संत वै. बंकटस्वामी व संत वै.भगवान बाबा यांचे माध्यमातून नेकनूर येथील वतनदार पाटील घराण्याशी नाते जोडले पुढे वै.संत भिमसिह महाराज यांच्या अशिर्वादाने पाटील घराण्याचा कायापालट झाला .

या आठ भावा पैकी चार भाऊ परिवारातून निजधामाला गेले . सेवानिवृत्त पोलीस अधिकारी रावसाहेब पाटील हे आज रोजी कुटूंबाचे छत्र असुन या कुटूंबात सोळा मुली एक भाची व जावायी असा मोठा परिवार ,रावसाहेब पाटील यांचे लग्नाला पंन्नास वर्ष झाल्याने लेक जावायी यांनी स्नेहमिलनाचा घाट घातला आणि यातच सास-याचा लग्न सुवर्ण महोत्सव साजरा करण्याचे आयोजन करून पुढील पिढीसाठी नाते कसे जपावे याचा आदर्श घालून दिला .

नेकनूर येथील गणेश मंगल कार्यालयात हा दोन दिवशीय सोहळा सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे उपस्थितीत आनंदात पार पडला . स्नेहमिलन आणि लग्नाचा वर्धापन दिन साजरा करतांना लेक ,जावायी आणि नातवांनबरोबर सर्वांनीच जुन्या परंपरा जतन करत कुलस्वामिनी कालिका देविचा अभिशेक तर नव्या परंपरेप्रमाणे गाण्यावर ताल ठेका धरला होता .

स्नेहभोजनाने या सोहळ्याला अधिकच गोडवा निर्माण केला .सुत्रसंचलन उच्चशिक्षीत नात नेहा जगधने व पाटील परिवातील एक सदस्य या नात्याने विजयकुमार पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन गोविंद पाटील यांनी केले .

जेष्ट जावायी कृष्णा शिनगारे यांनी ईवलेसे रोप लावियेले द्वारी त्याचा वेलू गेला गगणावरी या अभंगाचे सादरीकरण केले .

हा कौटूंबिक सोहळा पार पाडण्यासाठी नेकनूरचे योगेश पाटील व बंधू यांनी परिश्रम घेतले. सर्व लेकी जावाई नातु नाती असे आवर्जुन उपस्थित होते .

शिरूर कासार (वार्ताहर)

गेल्या एक दशकापासून एकता फाउंडेशन शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे. मी स्वतः या गोष्टीचा साक्षीदार असून ग्रामीण भागात अशी चळवळ उभी करून ती जिवंत ठेवणे हे काम दिसते तेवढे सोपे नाही. एकताची घोडदौड पाहता फाउंडेशन च्या सर्वच पदाधिकाऱ्यांसह सभासद व कार्यकर्ते अभिनंदनास पात्र असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई चे सदस्य तथा म.सा.प.संभाजीनगर कार्यकारिणी सदस्य मा.विलास सिंदगीकर यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित १९ वे राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलनात ते उद्घाटक पदावरून बोलत होते.

सुप्रसिद्ध साहित्यिक तथा बबन, ख्वाडा, छत्रपती शासन, रौंदळ सारख्या चित्रपटांचे गीतकार सुप्रसिद्ध कवी डॉ.विनायक पवार काव्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी एकता फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक अनंत कराड, सचिव पत्रकार गोकुळ पवार, प्रदेश युवक निमंत्रक इम्रान शेख, मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, विभागीय युवक संघटक ह.भ.प.सुनील महाराज केकाण यांची प्रमुख उपस्थिती होती. एकताच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य तालमणी हरिप्रसाद गाडेकर यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले तर एकता फाउंडेशन जामखेड तालुकाध्यक्ष परशुराम नागरगोजे यांनी काव्य संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन केले.

या संमेलनात सुनंदा शिंगनाथ (पुणे), स्वाती पाटील (आहिल्यानगर), शंकरराव मालोदे (संभाजीनगर), ज्ञानेश्वर हंडरगुळीकर (लातूर), प्राचार्य चंद्रशेखर कळसे (जळकोट) या निमंत्रित मान्यवरांनी सहभाग नोंदवून कार्यक्रमात विशेष रंगत आणली. एकता चे कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर यांनी



कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. बारामतीचे सुप्रसिद्ध कवी हनुमंत चांदगुडे यांनी या कविसंमेलनामध्ये उपस्थित राहून रसिक श्रोत्यांना मार्गदर्शन करत आपली एक रचनाही ऐकवली. एकताचे प्रदेश संघटक देवीदास शिंदे व कवीवर्य इम्रान शेख यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाची निर्मिती झाली आहे. राज्यभरातून अनेक कवींनी या काव्यसंमेलनात श्रोते म्हणून हजेरी लावली.



# डी बी टी च्या नावाखाली निराधारांची अडवणूक थांबवा अन्यथा अंदोलन करु - अर्जुन सुतार

गेवराई (प्रतिनिधी) तालुक्यात नेहमीच संजय गांधी, श्रावणबाळ निराधारांना वेठीस धरुन राजकारण करण्यात आले.व अजुन ही सुरुच आहे. निराधाराची नेहमीच अडवणूक ही राजकीय नेत्यांनी केली. नेत्याा बरोबर गेवराई तहसिल कार्यालयातील अधिकारी कर्मचारी निराधारांची अडवणूक करतात. गेवराई तहसिल कार्यालयातील अव्वल कारकुन सोमिनाथ पुर्णे व संजयगांधी इपरेटर गणेश अम्लेकर हे डि बी टी च्या नावाखाली अंध, अपंग, विधवा,वयोवृद्ध , निराधार हयातनामा व डि बी टी ची कागदपत्र देण्यासाठी आलेले निराधारांना आरेवारे ची भाषा करुन निरांधारांची अडवणूक तर पैश्याची लाच देणारे एजंट ला मानपान देवुन अपुर्ण कागदपत्र घेवुन कामे पुर्ण करतात. त्यामुळे अव्वल कारकुन पुर्णे व इपरेटर आम्लेकर यांची संजयगाधी विभागातून हकालपट्टी करा

अन्यथा हजारो निराधारांसोबत तहसिल कार्यालय गेवराई येथे अंदोलन करु असे प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष अर्जुन सुतार यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे कडविले आहे.

तसेच निराधारांना परेशान करण्यासाठी काहींना - काही फॉरमालीटी काढुन हैरान केले जाते. निराधारांच्या कडुन पैसे ची मागणी केली जाते. संध्या सुरु असलेले संजयगांधी,श्रावणबाळ निराधार योजनेचे लाभार्थ्यांकडुन हयात नामासाठी कागदपत्र तहसिल कार्यालय गेवराईत मागितले जाते. हयात नामासाठी वयोवृद्ध निराधाराची अडवणूक करुन गेवराई तहसिल कार्यालयात अधिकारी कर्मचारी कागपत्राच्या नावाखाली अंध, अपंग, विधवा,वयोवृद्ध , निराधारांकडुन पैश्याची मागणी केली जाते. निरांधारांची अडवणूक तर पैश्याची लाच देणारे एजंट ला मानपान देवुन अपुर्ण कागदपत्र घेवुन कामे पुर्ण करतात. अश्या अधिकारी व कर्मचारी त्या विभागातून हकालपट्टी करा अन्यथा निराधारांच्या न्याय हक्कासाठी शैकडो निराधार सोबत घेवुन मोर्चा काढणार असे प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष अर्जुन सुतार यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे कडविले आहे.

# तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी बीडमध्ये यावे - एस.एम.युसूफ

## बी.के. कॉलेज ऑफ फायर इंजीनियरिंग अँड सेफ्टी मॅनेजमेंटला आग्रह

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी बी.के. कॉलेज ऑफ फायर इंजीनियरिंग अँड सेफ्टी मॅनेजमेंटने बीड मध्ये यावे. येथे एमआयडीसी हव्या त्या प्रमाणात नसल्याने तसेच इतर उद्योगधंदेही नसल्याने जिल्हाभरातील सुशिक्षित तरुण-तरुणींना एक तर कुठेतरी अत्यंत तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागते किंवा बेरोजगार होऊन फिरावे लागते. जिल्ह्यातील हे चित्र पाहता औरंगाबाद येथील तरुण-तरुणींना अवघ्या एक ते दोन वर्षाच्या कोर्स नंतर शंभर टक्के नोकरीची हमी देणारे बी.के. कॉलेज ऑफ फायर इंजीनियरिंग अँड सेफ्टी मॅनेजमेंट ने बीडमध्ये येऊन येथेही शाखा सुरू करावी आणि येथील बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगार उपलब्ध करून द्यावा असा आग्रह औरंगाबाद येथील मुख्य शाखेत भेट दिल्यानंतर मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष बी.के. पठाण आणि प्राचार्य दीपक गायकवाड यांच्याकडे केला असता दोघांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला तसेच कॉलेजला भेट दिल्याबद्दल शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी सलमान खान पठाण, शेख मुबिनुद्दीन आणि शेख जाकीरुद्दीन उपस्थित होते.






याविषयी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे की, दहावी-बारावी नंतर इतर कोणतेही शिक्षण घ्यायचे म्हटल्यावर त्यावर अफाट खर्च करावा लागतो आहे. शिवाय नंतर नोकरी किंवा रोजगार मिळेलच याची शाश्वतीही राहिलेली नाही. मात्र फायर व सेफ्टी डिप्लोमा अत्यंत कमी पैशात होतो, वर्ष कमी लागतात तसेच कोर्स केल्याचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर महाराष्ट्रासह भारतातील इतर राज्यातही पटकन नोकरी मिळते. तसेच विदेशात जाऊन नोकरी करण्यास इच्छुक असलेल्यांना विदेशात जाऊनही नोकरी करता येते. हा डिप्लोमा झाल्यानंतर कॉलेज व्यवस्थापनच नोकरीची हमी घेऊन नोकरी उपलब्ध करून देते. औरंगाबादच्या बी.के. कॉलेज ने सन २००८ पासून आजपर्यंत हजारो तरुणांना देश-विदेशात नोकरी उपलब्ध करून दिली आहे. यामुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे. अनेकांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लागला आहे. तसेच आता शासकीय-प्रशासकीय कार्यालय, निमशासकीय कार्यालय, एमआयडीसी एरियातील कंपन्यांसह मोठ मोठी हॉटेल्स, मॉल्स, चित्रपटगृहे, मोठमोठ्या इमारती, अपार्टमेंट येथेही हा कोर्स केलेल्या तरुण-तरुणींना हमखास नोकरी मिळणार आहे तसेच फायर अँड सेफ्टी यंत्रणा व फायरमॅन शिवाय वर उल्लेख केलेल्या एकाही वास्तूला बांधकाम परवाना सुद्धा मिळणार नाही असे शासनाने जाहीर केले आहे. यामुळे या क्षेत्रात रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. हे पाहता बी.के. कॉलेज ऑफ फायर इंजीनियरिंग अँड सेफ्टी मॅनेजमेंट ने बीडमध्येही आपली शाखा सुरू करून येथील तरुणांना नोकरी उपलब्ध करून द्यावी. असा आग्रह मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी संस्थेचे अध्यक्ष बी.के. पठाण तथा प्राचार्य दीपक गायकवाड यांच्याकडे केला आहे. त्यांनीही याला सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरच बीड मध्ये येऊन पाहणी करू असे आश्वासन दिले आहे.

# वन्यजीवांचे माहेरघर असलेल्या सर्पराज्ञीत पॅरालीसीस झालेल्या हरणीचे बाळंतपण

## हरणीची तब्येत गंभीर ;बाळ सुदृढ

शिरूर कासार (प्रशांत बाफना):


सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रामध्ये गेल्या चार दिवसापूर्वी वन विभागाने उपचारासाठी दाखल केलेल्या एका पॅरालीसीस झालेल्या काळविटाच्या मादीने काल दुपारी एका गोडच बाळाला जन्म दिला.आईच्या तब्येत ही गंभीर असून बाळाची तब्येत सुदृढ असल्याची माहिती सर्पराज्ञीच्या संचालिका सृष्टी सोनवणे यांनी दिली. देशात वन्यजीवांचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध असलेल्या सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रात एका पॅरॅलिसिस झालेल्या हरणीचे( काळविट) पहिले बाळंतपण वन्यजीवांचे माहेरघर म्हणून ओळख असलेल्या सर्पराज्ञीत झाले हे विशेष ! तसंही पहिलं बाळंतपण हे माहेरीच असा अलिखित नियमच आहे निसर्गाचा. पॅरालिसिस झालेली ही काळवीटाची मादी कामखेडा तालुका जिल्हा बीड येथील शेतकरी काळकुटे यांच्या शेतात घायाळ अवस्थेत चार दिवसापूर्वी आढळून आली होती. या घटनेची माहिती कामखेडा येथील युवक सचिन मस्के यांनी वन विभागाला दिली



होती .त्यानंतर वन विभागाचे वनरक्षक पवार मॅडम व राजेंद्र कोकणे हे घटनास्थळी जाऊन या काळविटाच्या मादीस ताब्यात घेतले होते. त्यानंतर पुढील उपचारासाठी विभागीय वन अधिकारी अमोल गर्कळ यांच्या मार्गदर्शनाखाली या काळवीटाच्या मादिस तागडगाव येथील सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रात दाखल केले होते. सर्पराज्ञीत उपचारासाठी दाखल केल्यानंतर ही काळवीटाची मादी गर्भवती असल्याचे सर्पराज्ञीच्या संचालिका सृष्टी सोनवणे यांच्या लक्षात आले .त्यानतर या हरणीवर योग्य ते उपचार सुरू करण्यात आले. काल दिनांक आठ जुलै रोजी या हरणीने एका गोंडस (बाळाला) पाडसाला जन्म दिला असून बाळ सुदृढ असून आईची तब्येत मात्र गंभीर असल्याची माहिती सर्पराज्ञीच्या संचालिका सृष्टी सोनवणे व सिद्धार्थ सोनवणे यांनी दिली.

# आम्ही जनतेचा जनादेश नम्रपणे स्वीकारला आहे -अँड.प्रकाश आंबेडकर

आम्ही निराश झालो आहोत पण, आशा सोडलेली नाही. आम्ही आत्मपरीक्षण करून वंचित बहुजन आघाडीच्या रणनीतीतील त्रुटी तपासून आवश्यक त्या उपाययोजना जरूर करू. मतदारांबद्दल आमची कोणतीही तक्रार नाही. वंचित बहुजन आघाडीचा मूळ पायाच फुले-शाहू-आंबेडकर असून, जय फुले, जय सावित्री, जय शाहू, जय भीम यांच्याकडूनच आम्हाला ताकद मिळते. आमची बांधिलकी निरपेक्ष आहे. सामाजिकदृष्ट्या वंचित आणि शोषितांची बाजू मांडणे आणि त्यांच्या राजकीय प्रतिनिधित्व आणि हक्कांसाठी लढणे हेच आमचे ध्येय आहे.आम्ही आमच्या अपयशाचे आत्मपरीक्षण करू. हे समजून घेणे काही रॉकेट सायन्स नाही की, महाविकास आघाडीतील काही घटकांनी जाणीवपूर्वक वंचित बहुजन आघाडीला आघाडीत सामावून घेतले नाही. आम्हाला बैठकांसाठी आमंत्रित करण्यात आले होते. परंतु, ते सर्व मीडिया आणि मतदारांसाठी होते. आम्ही त्यांच्या जाळ्यात अडकलो आणि मतदारांना आमचा झालेला अपमान आणि आमच्या पक्षाप्रती महाविकास आघाडीची संकुचित वृत्ती पटवून देण्यात सपशेल अपयशी ठरलो.वंचित बहुजन आघाडीनेच आंबेडकरी चळवळ आणि संविधान वाचवण्याच्या लढ्याचे नेतृत्व केले होते. जेव्हा या प्रमुख पक्षांचे सदस्य सॉफ्ट हिंदुत्वात गुंतले होते आणि एनडीए १ आणि २ च्या सरकारच्या काळात राज्यघटनेत करण्यात येत असलेल्या सुधारणांवर मौन बाळगून होते. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएसोबत लढण्याचा अजेंडा नसल्याचे खछऊख- आघाडीच्या लक्षात आल्यावर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वापर केला. 'संविधान वाचविण्याचा लढा' आमच्या तत्त्वज्ञानातून आणि मोहिमेतून त्यांनी घेतला. खछऊख- आघाडीने दलित, आदिवासी, ओबीसी आणि मुस्लिम हे भाजपशी लढण्यास सक्षम विरोधक असल्याचे मतदारांना पटवून दिले. मात्र, प्रत्यक्षात या राजकीय पक्षांना केवळ स्वत:ला वाचवायचे होते आणि यासाठी त्यांनी बहुजनांच्या मतांचा वापर केला.मतदारांबद्दल आमची कोणतीही तक्रार नाही. त्यांना सांगितले गेले की, फक्त आणि फक्त खछऊख- आघाडीला मतदान केल्यास भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएपासून देश वाचवू शकतो. परंतु, तरीही एनडीए बहुमत मिळवण्यात यशस्वी झाला. खछऊख- आघाडीतील पक्षांचा ढासळणारा वाडा वाचवण्यासाठी आणि पुन्हा नव्याने उभारण्यासाठी बहुजन मतदारांच्या स्वतंत्र



नेतृत्वाचा स्वत:चा बालेकिल्ला पाडायला भाग पाडण्यात आले. या पक्षांना संविधान वाचवायचे असते, सामाजिक दृष्ट्या वंचित व शोषितांसाठी लढायचे असते, तर वंचित बहुजन आघाडी स्थापन करण्याची गरजच पडली नसती.खछऊख- आघाडीतील पक्षांनी दलित, आदिवासी, ओबीसी, मुस्लीम यांची मते घेतली आहेत. पण, त्यांच्याकडून घेतलेल्या पाठिंब्याला ते न्याय देतील की नाही, हा येणारा काळच सांगेल.भेदभाव करणाऱ्या वैदिक धर्माविरुद्ध आणि सामाजिकदृष्ट्या वंचित आणि शोषितांसाठी आम्ही सुरू केलेला लढा या निवडणुकीने अधोरेखित केला आहे आणि आम्हाला त्याचा अभिमान वाटतो. कारण, येत्या ५० वर्षांपर्यंत भाजप वैदिकवाद आणण्याचा उच्चार करणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हा वंचितांनी उभारलेल्या मोठ्या लढ्याचा परिणाम आहे, सहभाग आहे. त्यामुळे कोणीही संविधान बदलण्याचे धाडस केल्यास वंचित आणि शोषितांच्या प्रतिनिधींना आणि समर्थकांना त्याविरोधात उभे राहण्याची अधिक संधी मिळेल.दहा वर्षे देशात भाजपची सत्ता होती. गेल्या पाच वर्षांपासून भाजपने संविधानाची मोडतोड करून वैदिकवाद मांडायला सुरुवात केली. या विरोधात इंडिया आघाडीतील काही पक्ष सोडले तर संविधानाच्या समर्थनार्थ, वैदिकवादाविरोधात कोणीही भूमिका घेतलेली नाही. वंचित बहुजन आघाडीने मात्र भाजपच्या या भूमिकेविरोधात रान उठवले. हा निवडणुकीचा मुद्दा होतोय हे लक्षात येताच हा मुद्दा इंडिया आघाडीने स्वत:कडे घेतला.महाविकास आघाडीच्या शेवटच्या बैठकीत महाविकास आघाडीने २ जागा वंचित बहुजन आघाडीला देत असल्याचे सांगितले. त्यातील एक जागा अकोला आणि दुसरी जागा उत्तर मुंबई होती. महाविकास आघाडीचे नेते माध्यमाशी बोलताना या जागांचा आकडा ४ ते ६ सांगायचे आणि ते ज्या जागांचा उल्लेख करायचे त्यात आम्हाला २०१९ मधे एक लाखाच्या वर मतदान मिळालेली एकही जागा नसायची. यावरून लक्षात आलेली गोष्ट म्हणजे उत्तर मुंबईची न जिंकता येणारी जागा होती, तर अकोल्याच्या जागेत कधीही गेम होऊ शकतो. इंडिया आघाडी बरोबर जाऊन पडणे आणि स्वत:च्या ताकदीवर लढणे यात फरक आहे. स्वत:च्या ताकदीवर लढून टिकण्याचा मार्ग कायम राहतो आणि म्हणून आम्ही टिकण्याचा मार्ग स्वीकारला. महाविकास आघाडीने एवढे अपमानित करुनही आम्ही सहभागी होण्यासाठी पुरेपुर प्रयत्न केला. यासाठीचे पहिले पाऊलही वंचित बहुजन आघाडीनेच टाकले. जे गेले अनेक महिने दुर्लक्षित केले गेले. एक गोष्ट आम्ही अधोरेखित करतो की, महाविकास आघाडीने काही ठराविक बैठकींना आम्हाला बोलावले. बाकीच्या बैठकांना बोलावले नाही.महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीला थोडा वेळ आहे. येत्या काही महिन्यांत मतदारांशी अधिक मजबूत नाते निर्माण करण्यासाठी आम्ही त्यांच्यासोबत अधिक संवाद करू. आमच्यावर विश्वास दाखवणाऱ्या मतदार, समर्थक, हितचिंतकांना एकत्र घेऊन पुन्हा मोठ्या ताकदीने पुनरागमन करू. तसेच, सामाजिक दुष्प्रवृत्तींविरुद्ध आणि सामाजिक दृष्ट्या वंचित आणि शोषितांच्या स्वतंत्र राजकीय नेतृत्वासाठी आम्ही लढत राहू.

जय फुले, जय सावित्री, जय शाहू, जय भीम, जय संविधान !

**अँड.प्रकाश आंबेडकर,**
राष्ट्रीय अध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी.

# किसान अर्बनच्या वतीने शेतकऱ्यांना शेतीचा ताळेबंद हिशोब पुस्तिकेचे मोफत वाटप

## शेतकऱ्यांसाठी महेश बेदरेचा अभिनव उपक्रम ५००० पुस्तक प्रतीचे वाटप

गेवराई (प्रतिनिधी)

शेतकरी हा केंद्रबिंदू मानून गेल्या वीस वर्षापासून शेती विषयात अविरत कार्य करणारे कृषी भूषण महेश गणेशराव बेदरे यांनी शेतकऱ्यांना शेतीतील वार्षिक पिकाचा हिशोब लिहिण्यासाठी शेतीचा ताळेबंद या पुस्तकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वर्षभरातील पिकाची शेतीतील दैनंदिन खर्चाची टिपणी लिहिण्यासाठी शेतीचा ताळेबंद पुस्तिका किसान अर्बन च्या प्रथम वर्धापन निमित्त ५ हजार प्रति पुस्तिकेचे मोफत वाटप करून वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आले आहे




सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे तथा गेवराई तालुका काँग्रेसचे तालुका अध्यक्ष म्हणून कार्य करणारे महेश बेदरे यांनी पंधरा वर्षापासून मराठवाड्यातील शेतकऱ्यांना कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून नव तंत्रज्ञान देऊन शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवतात गत पाच वर्षापासून शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटपाबरोबरच गेवराई तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उसाची अडचण दूर करण्यासाठी जिल्हा बाहेरील कारखान्यांना ऊस पुरवठा करून जिव्हाळ्याचे नाते तयार केले आहे गेल्या एक वर्षापूर्वी किसान अर्बन को - ऑफ क्रेडिट सोसायटीची स्थापना करून अर्थक्रांतीमध्येही आपला ठसा उलटलेला आहे गेल्या एक वर्षामध्ये शंभर कोटीची उलाढाल करून किसान अर्बन ने ही आपले नाव गेवराई तालुक्यात कोरवले आहे संस्थेचे चेअरमन महेश बेदरे यांच्या माध्यमातून विश्वासाच्या जोरावर शेतकऱ्यांमध्ये किसान अर्बन ने आपले नाव कोरविले आहे किसान अर्बनच्या प्रथम वर्धपान दिना निमित्त विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शेतीचा ताळेबंद या पुस्तकाचे वितरण करण्यात आले शेतकऱ्यांना शेतीतील नांगरट, विविध मजूर खर्च, बियाण्याचा खर्च, खतांचा खर्च, वाहतुकीचा खर्च, अंतर मशागतीचा खर्च, फवारणीचा खर्च, व मिळणारे उत्पादन याचा अचूक खर्च लिहिण्यासाठी ही पुस्तिका शेतकऱ्यांसाठी ही पुस्तिका दिशादर्शक ठरेल व शेतीतीत बदल करण्यासाठी शेतकरी नक्कीच पुढाकार घेईल असा विश्वास महेश बेदरे यांनी व्यक्त केला.

# जमादारणीच्या फुलाजवळील जुना जालना रोड मोकळा करून देण्याची मागणी

गेवराई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र जमीन अधिनियम कलम १४२ अन्वे मौजे गेवराई येथील सर्वे क्र. ५७६ मधील सरकारी रस्त्यावर अतिक्रमण करत बंद करून सर्वे क्र. ५५१ ,५५२ व ५५३ इत्यादी सर्वे नंबर मध्ये जाण्या येण्यासाठी पूर्वीपार चालत आलेला ते ३३ फुटी जुना गेवराई जालना रस्ता अतिक्रमण करत बंद केलेला आहे. तरी तो रस्ता तात्काळ मोकळा करून देण्याची मागणी चे निवेदन गेवराई तहसीलदार देण्यात आले आहे.



जुना जालना रोड हा सर्वे नंबर ५७६ च्या बाजूने आहे. परंतु सदर सर्वे नंबरचे मालक मोजामखा खैरसखॉ पठाण व आजमखा खौरसरखा पठाण या दोन भावांनी सरकारी रस्त्यावर अतिक्रमण करून तो रस्ता पूर्ण पणे बंद केलेला आहे. शासनाच्या कोणत्याही नियमाचे पालन न करता स्वतःची पूर्णपणे बंद केलेला आहे. व विद्रूपा नदीवर अतिक्रमण केलेले आहे. सदरच्या अतिक्रमामुळे नदीचे पात्र कमी झाले आहे. अतिवृष्टी झाल्यास महापूर येण्याची शक्यता उद्भवून जीवित हानी होऊ शकते. तसेच वीटभट्टी चालून सदरच्या परिसरामध्ये प्रदूषण केले आहे. आम्ही शेतकऱ्यांनी रस्त्याच्या वाटा बद्दल विचारपूस केली असता अरे रवीची भाषा करून हुकूमशाही करत आहेत व तुम्ही काय करायचे ते करा व कुठे जायचे ते जा असे म्हणून आम्हाला धमकी देत आहेत. तरी सदर रस्त्याचे तहसीलदार साहेब यांनी आपल्या शासकीय नियमानुसार रस्ता हा पूर्ववत करून देण्याची मागणी मच्छिंद्र यशवंतराव आतकरे, किसन महादू आतकरे बळी निवृत्ती आतकरे, कचरू नारायण चव्हाण, उद्धव अश्रूबा पौळ, अनिल पांडुरंगा आतकरे व राजेश बाबासाहेब आतकरे ई. शेतकरी करत आहेत.

# शेतकरी २०२४ च्या खरीपाची पेरणी कशी करणार :भाई विष्णुपंत घोलप

पाटोदा (प्रतिनिधी)

सन २०२३ च्या खरीप हंगामात पावसाच्या खंडामुळे खरीप पिक जवळपास ८०% वाया गेली. शासनाने त्यावेळेस दुष्काळ जाहीर केला जी काही पिके आली ती काढणी आणि पेरणीला सुध्दा पुरली नाही. आज पावसाळ्याला सुरुवात झाली आहे. शेतकरी आर्थिक संकटात आहे. शेतकऱ्यांचा गेल्यावर्षीचा म्हणजे २०२३ चा खरीप पिकविमा किमान ८०% तरी शेतकऱ्यांना तात्काळ मिळाला पाहिजे तसेच पिक कर्जाचे नवे जुने करुन शेतकऱ्यांच्या पदरात काही सुध्दा पडत नाही.१०% पिककर्ज वाढुन म्हणजे बँकेला व्याजाची भरती करण्यासाठी मार्ग काढला आहे.



मा.जिल्हाधिकारी साहेबांनी शेतकऱ्यांना तात्काळ नवीन पिक कर्ज वाटप करण्यासाठी बँकांना आदेश द्यावेत आणि विमा कंपनीला सुचना देऊन २०२३ चा खरीप पिक विमा किमान सन २०२४ च्या खरीप पेरणीसाठी तरी तात्काळ द्यावा नसता शेतकऱ्यांचा मोठा उद्रेक होईल. शेतकरी खुप मोठ्या आर्थिक संकटात असल्यामुळे त्याला तात्काळ खरीप पेरणीसाठी मागील पिकविमा आणि नवीन पिककर्ज कोणताही विलंब न करता तात्काळ मिळावे.

या अगोदर भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने राज्याचे कृषीमंत्री तथा पालकमंत्री मुंडे साहेब आणि जिल्हाधिकारी,बीड यांना लेखी निवेदनाव्दारे वरील मागणी केलेली आहे. लोकसभा निवडणुकीमुळे वरील विषयाला जरी विलंब झाला असेल तरी आता केंद्रीय निवडणुक आयोगाने आचारसंहिता उठविली आहे. राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री आपल्या बीड जिल्ह्यातील असल्यामुळे वरील विषयाला गंभीरतेने घेऊन शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक संकटातुन बाहेर काढण्याचा मार्ग मोकळा करावा असे लेखी निवेदनाव्दारे भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय,पाटोदा यांच्या मार्फत मा.जिल्हाधिकारी साहेब,बीड तसेच माहितीस्तव राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री मुंडे साहेब व शेकापचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील आणि बीड जिल्ह्याचे खासदार मा.बजरंग(बप्पा) सोनवणे यांना दिले आहे.

# गेवराईचा भूमिपूत्र अविनाश कांबीकर दिग्दर्शित सुलतानची युरोप मधील आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवासाठी निवड

गेवराई (प्रतिनिधी)

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कथेवर आधारित सुलतान या लघुपटाची युरोप खंडातील जर्मनी येथे होणाऱ्या २१ व्या आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवासाठी निवड झाली आहे .साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सुलतान या कथेवर आधारित अविनाश कांबीकर यांनी दिग्दर्शित केलेला सुलतान या लघुपटाची युरोप खंडातील जर्मनी मधील स्टुटगार्ट या शहरात जुलै २०२४ मध्ये होत असलेल्या २१ व्या आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टीवल स्टुथगार्थ २०२४ साठी अधिकृत निवड झाली आहै. सुलतान लघुपटाचा वर्ल्ड प्रिमियर जर्मनीतील स्टुटगार्ट या शहरात जूलै महिण्यात पार पडणार आहे.

अविनाश कांबीकर हे मूळचे गेवराई तालुक्यातील कांबी( मंजरा ) या गावाचे रहिवाशी असून त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण गेवराई येथील र भ अट्टल महाविद्यालयात झाले आहे .ते महाविद्यालयीन काळापासून आपली सांस्कृतिक आवड जोपासत आहेत . त्यांचे सध्याचे वास्तव्य पुणे येथील पिंपरी चिंचवड येथे असून त्यांचा जाहीराती बनविण्याचा व्यवसाय आहे . यापुर्वी त्यांनी अनेक कार्पोरेट तसेच स्थानिक ग्राहकांसाठी जाहीराती तयार करण्याचे काम केले आहे. सुलतान त्यांचा पहिलाच लघुपट असून सुमारे हजार ते दिड हजार लघुपटातून सुलतानची २१ वा इंडियन आतंरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल स्टटगार्ट जर्मनी साठी निवड झाली आहे.

सुलतान लघुपटाचे संपुर्ण शुटिंग बीड जिल्ह्यातील बीड , माजलगाव, पात्रूड , श्रृंगारवाडी -(तालखेड ) या ठिकाणी झाले आहे , या लघुपटाचे सहनिर्माता विजय क्षीरसागर आहेत तसेच गेवराईतील जेष्ठ नाट्य कलाकार रंजीत सराटे यांची यामध्ये भूमिका आहे.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य जगातील विविध २७ भाषांमध्ये प्रसिध्द झालेले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या कथेवर आधारित सुलतान या लघुपटाची निवड प्रथमच आतंरराष्ट्रीय पातळीवर होत आहे. याचा दिग्दर्शक म्हणून मला प्रचंड आनंद होत आहे, अशी भावना बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील कांबी येथील भूमिपूत्र अविनाश कांबीकर यांनी व्यक्त केली . या लघुपटात प्रमुख भूमिकेत ख्वाडा फेम अभिनेते अनिल नगरकर , गणेश देशमुख, अनिल कांबळे , संतोष वडगिर, अजय साठे आहेत , या लघुपटाचे सांऊड डिझानिंग राष्ट्रीय पारितोषिक विजेते प्रसिद्ध सांऊड डिझायनर अविनाश सोनवणे यांनी केले आहे. तर कलादिग्दर्शक अतूल लोखंडे यांनी केले आहे. आंतरराष्ट्रीय महोत्सवासाठी निवड झाल्याबद्दल सुलतान च्या सर्व टीमचे सर्वत्र अभिनंदन होत आहे .

# जुनैद दुर्राणी यांची पोहेटाकळी येथे सदीच्छा भेट

## अनेक विषयांवर केली गावकऱ्यांशी चर्चा

पाथरी (प्रतीनीधी)

पाथरी मतदारसंघाचे युवा नेतृत्व जुनैदभैय्या दुर्राणी यांनी शनिवारी पोहेटाकळी येथे दीली सदीच्छा भेट.जेनैद दुर्राणी यांनी गावातील प्रतीष्ठीत नागरीकांसोबत बराच वेळ विविध विषयांवर चर्चा देखील यावेळी केली.सविस्तर वृत्त असे की,दी.७ जानेवीरी शुक्रवार रोजी सायंकाळी जेनैद दुर्राणी यांनी पोहे टाकळी येथे सदीच्छा भेट देत वीविध विषयांवर गावकऱ्यांशी चर्चा



केली.यावेळी जुनैदभैय्या सोबत भेटी दरम्यान कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आनंद धनले,आंनद वाकनकर,मोईज अन्सारी,विष्णु काळे,सदाशिव थोरात, यांच्यासह गावातील अशोक गोंगे, दत्ताभाऊ गोंगे,केशव बागल,प्रा.अनिल उजगरे,दीपक बागल,बाळु नाना बागल,भागवत काका बागल,बालासाहेब गोंगे,माऊली चव्हाण,मुरलीधर गोंगे,राजाराम गोंगे,विनोद गोंगे,अमोल गोंगे,रशीद शेख,अशोक शिंदे,हानुमान उजगरे,शेर खान,मुकद्दर खान,हामीद खान,अश्रफ शेख, पप्पू होगे,रमेश पानझाडे,भास्कर उजगरे,धम्मपाल उजगरे इत्यादी नागरीक मोढ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.


# पंकजाताईवर वैयक्तिक टीका करू नका

## त्या बीडच्या बरोबरीच्या हक्कदार आहेत-प्रा.सुशीला मोराळे

बीड (प्रतीनीधी)

सोशल मीडियावर पंकजाताईचा पराभव झाल्यानंतर आणि निवडणूक काळातही चुकीच्या त्यांच्यावर वैयक्तिक टीका टिपणी करणाऱ्या पोस्ट काही समाजकंटक प्रवृत्तीच्या लोकांनी टाकल्या आहेत एक स्त्री म्हणून मी त्या पोस्ट टाकणाऱ्या नालायक आवलादीचा जाहीर निषेध करते अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्त्या प्राध्यापिका सुशीलाताई मोराळे यांनी दिली आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीला विकृत केले गेले खालच्या स्तरावर ही निवडणूक लढवली गेली जिल्ह्यातील सोदार्हायाचे वातावरण संपविण्याचा प्रयत्न झाला खरे पाहता कोणीही उमेदवार एका जातीवर विजयी होऊ शकत नाही बजरंग सोनवणे फक्त मराठा मतावर विजयी झालेले नाहीत मुस्लिम, श्रमिक दलित ओबीसीनी त्यांना मते दिली आहेत पंकजाताईंनाही फक्त वंजारी समाजाने मते दिलेली नाहीत सर्वांनी त्यांना मते दिली आहेत मात्र काही उत्साही कार्यकर्ते अत्यंत खालच्या पातळीवर पोस्ट टाकत आहेत. जेवढा हक्क मुलाचा बापाच्या प्रॉपर्टीत आणि इतर क्षेत्रात हक्क आहे तितकाच मुलीचाही अधिकार आहे परंतु सासरला हि बहिण निघाली भावाची लाडी हे गाणे रील करून ट्रोल करणे अत्यंत चुकीचे आहे.



त्या त्यांच्या वडिलांच्या जहागिरीच्या बरोबरीच्या हिस्सेदार आहेत. खंबीर नेतृत्व करीत आहेत हारजीत होतच असते आज राष्ट्रवादीचे जे कार्यकर्ते पंकजाताईला सासर माहेर वरून ट्रोल करीत आहेत. त्यांनी बारामतीत सुप्रियाताई आपले वडील शरद पवारांचा वारसा चालवत आहेत तिथे सुप्रियाताई जमतात मग बीडमध्ये पंकजाताई लढल्या वडिलांचा त्या वारसा चालवत आहेत तर बिघडले कुठे संविधानाने तर महिलांना बरोबरीचा हक्क दिला आहे. जे आशा चुकीचे पोस्ट टाकत आहेत त्यांनी भानावर यावे समाजाचे स्वास्थ्य बिघडू नये. आशा मनोविकृतांना जनतेने धडा शिकवावा असे पत्रक प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी दिले आहे. इंदिरा गांधींनी सुद्धा त्यांच्या वडिलांची विरासत सांभाळली आहे.

# किल्ले रायगडावर रंगले शिवकालीन मर्दानी खेळ.काकडे महेश

पिंपळा ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पिंपळा येथील शिवशंभो मर्दानी आखाडा ता.आष्टी.जि.बीड यांनी शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिक रायगडावर दाखवून शिवभक्तांचे व आलेल्या मान्यवरांचे मन जिंकली.छत्रपती.संभाजीराजे भोसले यांच्या हस्ते सर्व कलाकारांचे स्वागत केले.व छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५० वा शिव राज्याभिषेक सोहळा सहा जून रोजी पार पडला.त्यामध्ये देशातील विविध मर्दानी आखाड्यांना छत्रपती संभाजीराजे भोसले व महाराणी संयोगिता राजे भोसले यांनी सार्वजनिक शिवराज्यभिषेक समिती भारत तर्फे आखाड्यांना आमंत्रित करण्यात आले होते.बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील पिंपळा या गावातील शिवकालीन मर्दानी आखाडा यांनी रायगडावरच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेऊन आपल्या गावाची व आपल्या भागाचे नाव रायगडाच्या मातीमध्ये लिहून ठेवण्याचे काम या ठिकाणी सर्व कलाकारांनी केली आहे.त्यामध्ये सर्वांनी आपली प्रात्यक्षिके सादर करत त्यात लाठी.काठी, दांडपट्टा, तलवारबाजी, हरी.गदगा,पटकाप अशा प्रकारची शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.यामध्ये बीड जिल्ह्यातील शिवशंभु मर्दानी आखाडा पिंपळा ता.आष्टी जि.बीड.यांनी शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिक दाखवून रायगडावर आलेल्या सर्व मावळ्यांचे मने जिंकले.शिवकालीन मर्दानी आखाडा यांचे सर्व मुले व मुली. खालील प्रमाणे कु.साक्षी सोनवणे.कु.साक्षी अरुण.कु.सृष्टी काकडे.कु.प्रतीक्षा निपुंगे.कु.यश भिटे.कु.कार्तिक लोखंडे.आदी कलाकारांनी यामध्ये भाग घेतला होता.या सर्वांना मार्गदर्शन करणारे वस्ताद.आनंद वाघ.शिवशंभु मर्दानी आखाड्याचे वस्ताद.महेश काकडे

शिवशंभू मर्दानी आखाड्याचे बीड जि.अध्यक्ष.दादा विधाते.पत्रकार.युवराज खटके.शिवराज्याभिषेक सोहळ्यामध्ये शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिक दाखवून रायगडाच्या पायरीवर आपल्या बीड जिल्ह्याचे नाव कोरत पराक्रम गाजवला.अशाप्रकारे शिवकालीन मर्दानी आखाडा यांनी आपली कला ही रायगडावर गाजवली आणि रायगडावरील समितीच्या वतीने सर्वांचे स्वागत करण्यात आले.

# उद्या नाभिक समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा माजलगावात गुणगौरव सोहळा

अंबाजोगाई (प्रतीनीधी)

महाराष्ट्र नाभिक महामंडळ, बीड जिल्हा आयोजित नाभिक समाजातील इयत्ता १० वी, १२ वी आणि नीट परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये जसे डॉक्टर, इंजिनिअर, वकील, नागरी सेवा, शासकीय निमशासकीय नौकरी मिळवलेल्या गुणवंतांचा गुणगौरव सोहळा तसेच जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

मागील अनेक वर्षांपासून महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात येते. तसेच यावर्षीही गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन सोमवार, दिनांक १० जून सकाळी ११ वाजता वैष्णवी मंगल कार्यालय, गजानन मंदिर रोड, माजलगाव (जि.बीड) येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याण दळे यांच्या शुभहस्ते स्वागत करण्यात येणार आहे. तर या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रदेश उपाध्यक्ष भगवान वाघमारे हे राहणार आहेत. तर यावेळी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेश कार्याध्यक्ष दामोदर बिडवे, प्रदेश सरचिटणीस पांडुरंग भवर, कर्मचारी महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष उत्तम सोलाणे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरेंद्र कावरे, बारा बलुतेदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश कानगावकर, मराठवाडा अध्यक्ष युवराज शिंदे हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास नाभिक समाजातील सर्व गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थीनी, पालक व नागरीकांनी या मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अनंत राऊत (केज), बीडचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे व महाराष्ट्र नाभिक कर्मचारी महामंडळाचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य डी.डी.राऊत व महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे तालुकाध्यक्ष मधुकर सुरवसे (अंबाजोगाई) यांनी केले आहे.

# पंकजाताईंना राज्यसभेवर घेऊन मंत्रीपद द्यावे- किरण चव्हाण

बीड (प्रतीनीधी)

मुंडे साहेबांचा बालेकिल्ल म्हणून ओळख असणाऱ्या बीड जिल्ह्यामध्ये मुंडे साहेबांना पाडण्यासाठी व त्यांचे वर्चस्व संपवण्यासाठी बारामतीकरांनी संपूर्ण आयुष्य घालवलं पण त्यांना ते जमलं नाही. ओबीसीचे कैवारी व दिनदुबळ्याचे नेतृत्व म्हणून मुंडे साहेबांची ख्याती होती , त्यांचाच वारसा पुढे नेत पालकमंत्री मा.धनंजय मुंडे,संघर्ष कन्या पंकजाताई व प्रीतम ताई यांनी ओबीसी समाजा पाठोपाठ इतर समाजाच्या न्याय हक्कासाठी सर्वसामान्यांचा आवाज म्हणून वेळोवेळी झगडत राहिले. पण आत्ता झालेल्या लोकसभा निवडणुकीत जातीय विषयाचा प्रयोग झाल्यामुळे पंकजाताईंचा निसटता पराभव झाला., ज्याप्रमाणे जाती-जातीमध्ये भांडणे लावून गोरगरीब ओबीसींना



मतदानापासून रोखण्यासाठी दाप दडप करण्यात आली त्यामुळे ही निवडणूक देशभर गाजली. ताईंचा पराभव करून महाराष्ट्रातील ओबीसी नेतृत्व संपवण्याचा कुटील डाव रचला गेला आहे तरी केंद्रीय नेतृत्वाने पंकजाताईंना राज्यसभेवर घेऊन केंद्रीय मंत्रीपद देऊन ओबीसी समाजाला न्याय द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी सेल प्रदेश सरचिटणीस किरण चव्हाण यांनी पक्ष नेतृत्वाकडे केली आहे.

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी खते- बियाणे यांची उपलब्धता व दर नियंत्रण ठेवा- कृषी मंत्री धनंजय मुंडे

### जिल्ह्यातील पाणी व चारा टंचाई बाबत घेतला आढावा

बीड (प्रतीनीधी)

जिल्ह्यात यंदा चांगला पाऊस होईल असा अंदाज आहे या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना बियाणे व खते यांचा माफक दरात पुरवठा होईल याची खबरदारी घ्या असे निर्देश कृषी मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले.व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून या सर्वांचा आढावा पालकमंत्री मुंडे यांना यांनी आज घेतला. या आढावा बैठकीस जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब जेजुरकर, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच सर्व संबंधित यंत्रणांचे अधिकारी बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयातून सहभागी झाले.

जिल्ह्यात यंदा चांगला पाऊस असेल अशी अपेक्षा




व्यक्त करताना शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते आणि पीक कर्ज यांच्यासह केंद्र व राज्य सरकारच्या सर्व योजनांचा लाभ देण्यासाठी कृषी विभागाला निर्देश दिले आहेत, असे पालकमंत्री म्हणाले.जिल्ह्यात कुणी खते आणि बियाणे यांची कृत्रिम टंचाई निर्माण करीत असेल किंवा चढ्या दराने विक्री करीत असेल तर त्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश पालकमंत्री मुंडे यांनी यावेळी दिले.

बीड जिल्हा फार्मर-आयडी मध्ये देशात अव्वल आहे, ही आनंदाची बाब आहे. या फार्मर -आयडीच्या आधारे जिल्ह्यात आतापर्यंत २२ हजार शेतकऱ्यांना कर्ज देण्यात आले आहे. त्याचा लक्षांक वाढवून आता १ लाख पर्यंत नेण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे, श्री मुंडे यांनी सांगितले.

पीक कर्ज वाटप

जिल्ह्यात १,७०७ कोटी रुपये खर्च वाटपाचे नियोजन आहे. यात ४० टक्के वाटा हा ग्रामीण बँकेचा राहील.

## अठरा दिवस झाले तरी शिवाजी नगर पोलिसांना अल्पवयीन मुलीचा शोध लागेना
## शिवाजी नगर पोलीसाचा तपास संथ गतीने

बीड (प्रतिनिधी)बीड दिनांक २० मे रोजी शिवाजी नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून एक अल्पवयीन मुलगी कॉम्प्युटर क्लासला गेली असता,शिवणी गावातील मुलाने तिला जबरदस्तीने पळून नेल्याची तक्रार मुलीच्या आई ने शिवजी नगर पोलिसात दिली आहे.




मुलगी अल्पवयीन असल्याने कुटूंब नातेवाईक चिंतेत आहेत,मुलीचे काही बरेवाईट तर झाले नाही ना?असा प्रश्न पडला आहे.अठरा दिवस उलटले तरी मुलाची शोध लागला नसल्याने पोलीसाने घटनेचे गांभीर्य नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.मुलीचे आई,वडील शिवाजी नगर पोलिस ठाण्याला चकरा मारून परेशान झाले आहेत. पोलीसाचा तपास संथ गतीने सुरु असल्याचे यावरून दिसत आहे की कोणाच्या दबावाखाली पोलिस तपास करण्यात दिरंगाई करत आहेत असा प्रश्न आई-वडिलांना पडला आहे.मुलीच्या वडिलांनी एका मुलाचे संशय म्हणून नाव दिले त्याचा सोशल मीडियावरील इंस्टाग्राम चा आयडी देखील दिला तरी पोलिसाना सुगावा लागत नसल्याने कुटुंब भयभीत झाले आहे.सातरा दिवसानंतर पण तपास शून्य असल्यामुळे कुटूंबात चिंतेचे वातावरण पसरले आहे. मुलीचे आई वडील पोलीस अधीक्षक यांना भेटण्यासाठी गेले होते.पोलिसानी लवकर तपास लावून मुलीचा शोध घेऊन मोबाईल नंबर च्या आधारे लोकेशन घेऊन तपास लवकर करावा अशी मागणी मुलीच्या आई-वडिलांनी केली आहे.

## खत घेवून जाणारा ट्रक पलटी

प्रतिनिधी ।वाल्हे गंगाधर

होवून एक जण ठार झाल्याची दुर्घटना घडली. याबाबत मिळालेली माहिती अशी की, धारुर उ्हर्रीी शहरापासून जवळच असलेल्या राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी वर घाटातील एका अवघड वळणावर शनिवारी (दि.८) सकाळी अपघात -ललळवशपीं घडला. धाराशिवहून माजलगावकडे खताचे पोते घेवून जाणारा ट्रक (क्र. एम एच २५ यु ०२५१) एका वळणावर ब्रेक निकामी होवून चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रक पलटी झाला. यात ड्रायव्हर व क्लिनर गंभीर जखमी झाले. दोन्ही जखमीना नागरीकांनी तात्काळ धारुर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. यानंतर पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथे हलवण्यात आले. मात्र उपचार सुरु असताना चालक राहुल चंदनशिवे (वय ३६ वर्ष) ठार झाल्याची तर क्लिनर विष्णु सुरवसे (वय २५ वर्ष) पाय फ्रैक्चर असल्याची माहिती मिळाली.




### बी -बियाणे चढ्या भावाने विक्री करणाऱ्या दुकानदारास कृषीमंत्री महोदय यांनी
## जिल्हा प्रशासनास आदेश देऊन शेतकऱ्यांची लुट थांबवा-राजश्री मोरे

पत्रकार/किरण जावळे

दि. ७ जुन अगोदरच दुष्काळाच्या फटक्याने उध्वस्त झालेला शेतकरी खरीप हंगामाची पेरणीची तयारी करीत असताना कापुस,सोयाबीन या पिकाला प्राधान्य देत आहे परंतु महाबीज बियाणांचे व्यापाऱ्यांनी कृत्रिम तुटवडा निर्माण केला आहे.तुलसी कंपनीची कब्बडी, ॲग्रो सिड्स कंपनीचे ७०६७ बियांणाची विक्री ८६४ रुपये किंमतीची बॅग ब्लक ने १२५० ते १३५० पेक्षा जास्त दराने बियाणे विक्री करून शेतकऱ्याची लूट सुरू केली जात आहे.सोयाबीन २२०० रु किंमतीची बॅग ३००० रु पर्यंत काळ्या बाजारात विक्री होत असताना. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे साहेब यांनी विशेष लक्ष वेधून जिल्हा प्रशासनास सुचना देऊन कृषी दुकानदारांचे स्टिंग ऑपरेशन करून ही लूट थांबवावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व भावी नगरसेवक राजश्री मोरे यांनी केली आहे.

महागाई त्रस्त झालेल्या शेतकऱ्याला आस्मानी व सुलतानी या दोन्ही संकटाचा सामना करावा लागत आहे. मागील खरीप हंगामात बियाणे पेरले ते उगवलेच नाही, शासनाकडे तक्रार केली तर नुसते पंचनामे करून मोकळे होतात मात्र सरकार शेतकऱ्यांचे आर्थिक मदत मिळून देण्याकरिता दुर्लक्ष करते, या वर्षी वेळेवर पाऊस पडण्याची स्थिती निर्माण झाली परंतु कापुस बॅग, सोयाबीन बी-बियाणाचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात आहे, तात्काळ शेतकऱ्यांची लूट थांबवावी अशी मागणी शेतकरीवर्ग करत असताना जिल्हा प्रशासनास झोपेचे सोंग घेवून कृषी दुकानदारांची पाठराखण करताना दिसत आहेत.



शेतकरन्यानी बी बियाणे खरेदीच्या पावत्या व गोण्या जपून ठेवाव्यात, याही वर्षी उगवण झाली नाहीतर सीड कंपन्याला जाब विचारावा लागेल ,संघटित होऊन शेतकऱ्यांनी स्वतः ही लुट होऊ देऊ नये असे सामाजिक कार्यकर्ते व भावी नगरसेवक राजश्री मोरे यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे.

### पंकजा मुंडे यांच्या विरोधात आक्षेपार्ह
## पोष्ट उद्या वडवणी
## बंदची हाक



### सकल ओबीसी समाजाने तहसीलदार व पोलीस स्टेशनला दीले निवेदन

वडवणी/ प्रतिनिधी

सकल ओबीसी समाजाच्या नेत्या आदरणीय पंकजाताई मुंडे व लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब पालकमंत्री धनंजय मुंडे, यांच्या बद्दल सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट व कमेंट करण्यात आलेल्या असून त्या विरोधात समाज कंटकावर कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. या मागणीसाठी दि १० जून रोजी वडवणी शहर कडकडीत बंद ठेवण्याचे हाक दिल्या असून असे लेखी निवेदन सकल ओबीसी समाजाने व वंजारी समाजाने तहसीलदार वडवणी व सपोनी वडवणी यांना दिले आहे.

बीड जिल्हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा आहे, त्यात ऊस तोडणी मजूर हा सर्व जाती धर्मातील समाज पंकजाताई मुंडे व स्वर्गीय लोकनेते मुंडे साहेब यांना मानतो. कारण त्यांचे योग्य कष्टाचा मोबदला, साखर संघाकडं, मागून त्यांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळून द्यायचं काम स्वर्गीय लोकनेते व त्यांच्या पाठीमागे आहेत. मात्र ४ जूनला लोकसभेचा निकाल लागल्यानंतर पंकजाताई मुंडे यांचा थोडक्यात मताने पराभव झाला होता. त्यामुळे काही समाजकंटक जाती धर्मात विष पेरणारे लोक खूप, वाईट कमेंट्स करत आहेत. स्व लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्यावर देखील वाईट कमेंट्स केल्या जातात. यामुळे सर्व ऊसतोड मजूर व सकल ओबीसी समाजाने तहसीलदार वडवणी व पोलिस निरीक्षक यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. स्वर्गीय लोकनेते मुंडे साहेब यांच्यावर प्रेम करणाऱ्या सर्व जाती धर्मातील लोक, या बंदमध्ये सहभागी होणार आहेत. या अशा आक्षेपार्ह पोस्टमुळे ओबीसी समाजात संतापची लाट येताना दिसत आहे. अशी चर्चा आता संपूर्ण बीड जिल्ह्यात होताना दिसते.



महिला सुरक्षेसाठी नियुक्त असलेल्या पीएसआय सौ. मीना तुपे मॅडम यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना विजय पंडितराव नवले( मराठवाडा विभागीय अध्यक्ष, संत रविदास महासंघ महाराष्ट्र प्रदेश )व शिरीष क्षीरसागर .नितीन मस्के




पाटोदा /प्रतिनिधी

सालाबादाप्रमाणे पाटोदा शहरात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे .यांची जयंती मोठ्या उत्सवात वेगवेगळ्या समाज उपयोगी कार्यक्रमाने साजरी करण्यात येते या वर्षी जयंती उत्सव समिती निवड करण्यासाठी दि.८.५.२४ शनिवार रोजी सायंकाळी .साठे नगर येथे बैठक घेऊन.न.प.सभापती किशोर अडागळे याच्या मार्गदर्शनाखाली जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली.यावेळी सर्वानुमते २०२४ जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी .नितीन भाऊ आडागळे. व उपाध्यक्षपदी रवी अडागळे. सचिव पदी किशोर सुदाम अडागळे. कोषाध्यक्षपदी सुमित अडागळे सहसचिव वैभव गायकवाड. संघटक आकाश अडागळे व सदस्य पदी साठेनगर मित्र मंडळ व समाज बांधवांची निवड करण्यात आली तरी या बैठकीस विविध सामाजिक विषयावर चर्चा झाली.यावेळी उपस्थित .युवा नेते विजय अडागळे. योगेश सानप .प्रवीण अडागळे. पवन अडागळे. नितीन अडागळे . अरविंद सरोदे .अजित अडागळे आकाश खवले. सनी अडागळे चेतन जावळे. प्रणव जावळे.व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

## कारंजाचा टावर-शफिक भाऊचा पावर

### एआयएमआयएम अंगार है, 'हम दो हमारे बारह' पिक्चर भंगार है 'हम दो हमारे बारह' पिक्चर चे बारा वाजले

बीड (प्रतिनिधी)

वादग्रस्त चित्रपट 'हम दो हमारे बारह' बीड जिल्ह्यात प्रदर्शित होऊ देणार नाही असा इशारा एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांनी दिला होता तसेच बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना निवेदन देऊन हा चित्रपट जिल्ह्यात प्रदर्शित होऊ देऊ नये अशी विनंती ही केली होती तेव्हा पोलीस अधीक्षकांनी बीड जिल्ह्यात हा चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही असे आश्वासन दिले होते. याला अनुसरून दिनांक सात जून २०२४ रोजी प्रदर्शित होणारा हा चित्रपट बीड जिल्ह्यात प्रदर्शित करण्यात आला नाही म्हणून शफिक भाऊंनी जिल्हा प्रशासन पोलीस प्रशासनासह चित्रपटगृह चालकांचे आभार व्यक्त केले आहे.

'हम दो हमारे बारह 'हा समाजासमाजात कलह आणि वाद निर्माण करणारा चित्रपट असल्याने समाजात शांतता भंग होण्याचा धोका होता. हा चित्रपट बीड जिल्ह्यात प्रदर्शित होऊ देणार नाही असे एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांनी म्हटले होते. याविषयी एआयएमआयएम पक्षाकडून बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफीक भाऊ यांनी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना निवेदन देऊन राष्ट्रपती, गृहमंत्री, केंद्रीय फिल्म प्रमाणन बोर्ड (सेन्सर बोर्ड) चे चेअरमन, केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, आणि गृहमंत्री यांनाही निवेदन पाठविले होते. हा चित्रपट इस्लाम धर्म व मुस्लिम समाजाविषयी चुकीचे चित्रीकरण करून बनविण्यात आलेला आहे. आणि विशेष करून मुस्लिम समाजातील महीलांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला होता. मुस्लिम समाज व इतर जाती मध्ये विष पेरण्याचे कारस्थान अशा चित्रपटाद्वारे करण्यात येत होते या पूर्वीही कश्मीर फाइल्स, द केरला स्टोरी सारखे चित्रपट इस्लाम धर्म व मुस्लिम महिलांवर ताशेरे ओढणारे होते. धर्म कोणताही असो त्यात इतर धर्मियांनी नाक खूपसून कोणताही एक धर्म किंवा त्या धर्मात असलेल्या आचारसंहितेचे चुकीच्या पद्धतीने प्रदर्शन करू नये.' हम दो हमारे बारह 'या चित्रपटात नेमके तेच करण्यात आले होते. चित्रपट बनविणाऱ्यांची ही कृती इस्लाम धर्मासह मुस्लिम समाजाला विनाकारण बदनाम करण्याचे षडयंत्र होते. यामुळे मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला होता. हा चित्रपट जर चित्रपटगृह मध्ये प्रदर्शित करण्यात आला तर शांतता भंग होण्याची व अनुचित प्रकार घडण्याची शक्यता होती. म्हणून राष्ट्रीय अध्यक्ष खा बॅरिस्टर असदुद्दीन औवैसी साहेब, प्रदेश अध्यक्ष मा.खा ईम्तियाज जलील साहेबाला, कार्याध्यक्ष डॉ गफ्फार कादरी साहेब, मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला साहेब यांच्या आदेशानुसार शफिक भाऊंनी इस्लाम आणि मुस्लिमांविषयी गरड ओकणारा 'हम दो हमारे बारह' हा चित्रपट बीड जिल्ह्यात प्रदर्शित करू नये, या चित्रपटावर कायमस्वरूपी



बंदी घालावी. हा चित्रपट निर्माण करणारा निर्माता, बनविणारा दिग्दर्शक आणि यातील कलाकारांवर गुन्हे दाखल करण्यात यावे. अशी मागणी ही एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांनी केले होते. जर हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आलाच तर एआयएमआयएम पक्ष लोकशाही मार्गाने हा चित्रपट बंद पाडेल, असा इशाराही शफिक भाऊंनी दिला होता. तसेच या चित्रपटाविषयी ड. शेख शफीक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने कर्तव्यदक्ष बीड जिल्हा पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकुर यांची भेट घेऊन या चित्रपटाविषयी निर्माण झालेली जनभावना विषद केली होती. तेव्हा पोलिस अधीक्षकांनी सकारात्मक प्रतिसाद देत बीड जिल्ह्यात हा चित्रपट प्रदर्शित होणार नाही असे आश्वासन दिले. अन् त्यांनी दिलेले आश्वासन पाडले ही. म्हणून शफिक भाऊंनी बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांसह जिल्ह्यातील चित्रपटगृह चालकांचेही आभार व्यक्त केले आहे. तसेच बीड जिल्हा एमआयएम जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, तालुका अध्यक्ष शहर अध्यक्ष, नगरसेवक यांचे पण आभार मानले.

कश्मीर फाइल्स, केरला स्टोरी, हमारे बारह सारख्या भंकस व जातीवाचक चित्रपटांना बनविण्यास प्रोत्साहन देणारा भारतीय जनता पक्ष आता मोदी सरकार आणि मै पासून एनडीए सरकार आणि हम पर्यंत आला आहे. तसाच आता तो असे भंकस चित्रपट बनविण्यास प्रोत्साहन देणार नाही. अशी अपेक्षा आता बदललेल्या सत्ता समीकरणामुळे भाजप सारख्या जातीयवादी पक्षाकडून निर्माण झाली आहे. दरम्यान २०१४ मध्ये भाजप सत्तेत आल्यापासुन मुस्लिम विरोधी चित्रपट प्रदर्शित होत होते. यामुळे इतर समाजात तेढ, तिरस्कार, चिड निर्माण होत होती.

यापुढे असे भंकस व फालतू चित्रपट कुणीही बनविण्याचे धाडस करू नये. जर कुणी बनवलेच तर चित्रपटगृहात ते प्रदर्शित होता कामा नये. अन्यथा चित्रपट प्रदर्शित होऊ न देण्यास आवश्यक ते कार्य करण्यात येईल असेही शफिक भाऊंनी म्हटले आहे.

मुस्लिमांची मते लई मऊ अन् प्रश्न नको रे भाऊ, वा रे वा सेक्युलर पक्ष!

निवडणूक मग ती कोणतीही असो, प्रत्येक निवडणुकीमध्ये मुस्लिम मतदारांना त्यांच्या मतदानासाठी गोंजारण्यात येते पण फक्त ते निवडणुकीपुरतेच. एकदा निकाल लागला की, मग हाच मुस्लिम मतदार स्वतःला सेक्युलर म्हणणाऱ्या पक्षांना नकोसा होतो. त्यांचे प्रश्न आळणी वाटतात. मुस्लिमांवर होणारे अन्याय, अत्याचार, भंकस चित्रपटांबद्दल स्वतःला सेक्युलर म्हणून घेणारे पक्ष, त्यातील नेते, कार्यकर्ते मुगच नाही तर बेडूक गिळल्यासारखे गप्प असतात तर आंधळे झाल्यासारखे त्यांना काही दिसत नाही आणि बहिऱ्यासारखे ऐकायलाही येत नाही, वारे वा सेक्युलर पक्ष.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT